## महाराष्ट्र विधानमंडळ ग्रंथालयाकरीता नियम :-

**१.** विधान परिषदेच्या किंवा विधानसभेच्या सदस्यांच्या उपयोगाकरीता ग्रंथालयाची योजना आहे. परंतु प्रधान सचिवांची पूर्वपरवानगी घेवून सरकारच्या कोणाही राजपत्रित अधिकाऱ्यांना ग्रंथालयातून पुस्तके मिळू शकतील.

**२.** **(अ)** कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत ग्रंथालयातून केव्हाही पुस्तके मिळू शकतील.

**(ब)** ज्या दिवशी विधान परिषदेची किंवा विधानसभेची बैठक असेल त्या दिवशी विधान परिषदेचे किंवा विधानसभेचे अधिवेशन तहकूब होईपर्यंत ग्रंथालय सुरू राहील.

**३.** ग्रंथालयातून पुस्तक घेतल्यानंतर ग्रंथ देवघेव कार्डावर ग्रंथ मिळाल्याची सही करावी व ग्रंथ परत केल्यानंतर कार्डावरील नोंद कमी केल्याची खात्री करावी.

**४.** सदस्यांनी -

**(अ)** विधान परिषदेचे किंवा विधानसभेचे अधिवेशन चालू असता घेतलेली पुस्तके, ती घेतल्यापासून सात दिवसांचे आत परत केली पाहिजेत.

**(ब)** अन्य कोणत्याही वेळी घेतलेली पुस्तके ती घेतल्यापासून १५ दिवसांचे आत परत केली पाहिजेत.

**५.** कोणत्याही वेळी कोणतेही पुस्तक प्रधान सचिवांना परत मागविता येईल.

**६.** कोणाही सदस्यांकडून आलेले पुस्तक, ते दुसऱ्या कोणाही सदस्यास नको असेल तर ते त्यास पुन्हा देता येईल.

**७.** नियम ४ मध्ये दिलेल्या मुदतीपेक्षा अधिक दिवस कोणाही सदस्याकडे पुस्तक किंवा पुस्तके असतील तर त्यास आणखी दुसरे पुस्तक देण्यात येणार नाही.

**८.** कोणत्याही सदस्यास एकाच वेळी ग्रंथालयाची दोनपेक्षा अधिक पुस्तके आपणाजवळ ठेवता येणार नाहीत, जर एखाद्या सदस्यास दोनपेक्षा अधिक परंतु एकूण चार पुस्तके पाहिजे असल्यास प्रधान सचिवांचे आदेश घेण्यात यावेत.

**९.** प्रधान सचिवांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय संदर्भग्रंथ ग्रंथालयाबाहेर देण्यात येणार नाहीत.

**१०.** दोन स्मरणपत्रानंतर जर पुस्तके परत करण्यात आली नाहीत तर त्या पुस्तकांची किंमत ही, सदस्यांच्या पुढील महिन्याच्या पहिल्या दिवशी मिळणाऱ्या वेतनामधून वसूल करण्यात यावी.

**११.** ग्रंथालयातील पुस्तकांवर टिपा लिहिता किंवा खूणा करता कामा नये.

**१२.** प्रेक्षकांना ग्रंथालयात प्रवेशाची परवानगी नाही.

**१३.** ग्रंथालयात शांतता राखली पाहिजे.

**१४.** ग्रंथालयातील टेबलावर "सूचना पुस्तक" ठेवण्यात येईल आणि त्या पुस्तकात नवीन पुस्तके विकत घेण्याबाबत किंवा ग्रंथालयासंबंधातील अन्य कोणत्याही गोष्टीबाबत करावयाच्या असतील त्या सूचना नमूद करता येतील.

**१५.** विधानसभेचे किंवा विधानपरिषदेचे अधिवेशन चालू असताना पुढील प्रकाशने ग्रंथालयाच्या टेबलावर ठेवण्यात येतील :-

**(अ)** दिवसाच्या कामकाजाचा क्रम

**(ब)** अधिवेशनातील अध्यादेशांच्या प्रती

**(क)** महाराष्ट्र सिव्हिल लिस्ट.

**(ड)** विधानपरिषदेचे किंवा विधानसभेचे मागील अधिवेशन समाप्त झाल्यानंतर आलेल्या सर्व प्रशासन अहवालांच्या प्रती.

**(ई)** दोन्ही सभागृहांसमोर प्रलंबित असलेल्या विधेयकांच्या प्रती.

**(फ)** ग्रंथालयात येणाऱ्या वर्तमानपत्रांचे आणि नियतकालिकांचे अगदी अलिकडील अंक.

**१६.** ह्या नियमांत, प्रधान सचिव म्हणजे महाराष्ट्र विधानसभेचे/विधानपरिषदेचे प्रधान सचिव.